# प्रेसनोट

जा.क्र./पोउप-आ/वाहतूक/6750/२०१९ पुणे शहर, दिनांक- १९.०८.२०१९.

**विषय :-चारचाकी वाहनास लावण्यात आलेला सरकारी जॅमर चोरी प्रकरणी चोरीचा गुन्हा दाखल केले बाबत.**

---------------OO---------------

दिनांक- १८/०८/२०१९ रोजी १७.३० वा. चे सुमारास वैशाली हॉटेलच्या समोर ब्रिटीश लायब्ररी लेन,डेक्कन पुणे या ठिकाणी नो-पार्कींग मध्ये पांढ-या रंगाची चारचाकी वॅगनआर कार नं. एम.एच.१२ एन आर ३६४५ वरील चालकाने पार्क केली होती, सदर वाहनचालकाने वाहतुकीचे नियमाचा भंग केल्याने सदर कारचे पुढील चाकाला डेक्कन वाहतुक विभाग पुणे कडून शासकीय लोखंडी जॅमर लावुन वाहन अटकावून ठेवले असताना सदर वाहनचालकाने त्याचे वाहनास लावलेले सरकारी लोखंडी जॅमर हे वाहतुक विभागाचे समंतीशिवाय वाहनाचे चाकाचे जॅमर काढून ते चोरुन नेले असून त्याबाबत डेक्कन वाहतुक विभागाने सदर कारचालकाचे विरुध्द डेक्कन पोलीस स्टेशन पुणे येथे गु.रजि.क्र. २५३/२०१९ भा.द.वि.कलम ३७९,४२७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

यापुर्वी सिंहगडरोड पोलीस ठाणे येथे सरकारी जॅमर चोरी बाबत गु.रजि.क्र. २४३/२०१६ भा.द.वि.कलम- ३७९,४२७ प्रमाणे फिर्याद देण्यात आली होती, त्यावरुन सदर खटल्याची सुनावणी श्री. व्ही.बी. गुळवेपाटील,प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,शिवाजीनगर न्यायालय पुणे यांचे कोर्टात होवून त्यामध्ये मा. कोर्टांनी दिनांक ०६/१०/२०१७ रोजी आरोपी यास सीआरपीसी २४८(२) अन्वये कलम- ३७९,४२७ मध्ये दोषी ठरवून त्यास कोर्ट उठेपर्यंत शिक्षा व ५०००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ७ दिवसाची साधी कैद अशी शिक्षा सुनावलेली आहे.

तरी वाहतुक शाखा पुणे शहर कडून नागरिकांना अवाहन करण्यात येते की,आपले वाहन हे मनाई असलेल्या ठिकाणी तसेच सार्वजनिक वाहतुक अडथळा होईल अशा रितीने पार्क करु नये तसेच वाहतुक शाखेकडून वाहनास लावलेले जॅमर हे शासकिय मालमत्ता असून ते परस्पर तोडून घेऊन जावू नये तसे केल्यास वरीलप्रमाणे शिक्षा होऊ शकते.

पोलीस निरीक्षक
डेक्कन वाहतुक विभाग,पुणे शहर

प्रत :- सर्व संबधितांना.